मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज : मोशीकरांचे भक्ती-शक्ति स्थळ

## मोशी ग्रामस्थांचे श्रध्दास्थान असलेले श्री नागेश्वर महाराज यांचा भंडारा उत्सव आजपासून सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी ग्रामस्थांचे श्रध्दास्थान असलेले श्री नागेश्वर महाराज यांचा भंडारा उत्सव व श्री भैरवनाथ महाराज यात्रेला गुरुवार (दि.२७) आजपासून सुरुवात होत आहे. दीडशे वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवासाठी मोशी ग्रामस्थांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मानाच्या ओटीसाठी लाखोंच्या बोलीचा लिलाव आणि हजारोंच्या संख्येने महाप्रसादाच्या भंडाऱ्यासाठी राज्यात मोशीतील श्री नागेश्वर महाराज यांचा भंडारा उत्सव व श्री भैरवनाथ महाराज यात्रा आहे. इथे सुमारे तीस वर्षांहून अधिक काळापासून परम भक्तीचा नंदादीप अखंड तेवत आहे.

नागेश्वर महाराज भंडारा उत्सवाची जय्यत तयारी श्री नागेश्वर महाराज मंदिर व मोशी प्रवेशद्वार तपोवन भूमी येथे फुलांच्या माळा, विद्युतरोषणाईने करण्यात आली आहे. याठिकाणी काकड आरती, किर्तन, प्रवचन, नामस्मरण असे धार्मिक कार्यक्रम सुरु झाले आहेत.

**..अशी आहे कथा**

पुणे-नाशिक महामार्गावरील मोशीगावातून श्री क्षेत्र आळंदीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मुख्य चौकात पूर्वाभिमुखी विशाल असे श्री नागेश्वर महाराजांचे आकर्षक असे मंदिर आहे. हे गावचे मुख्य ग्रामदैवत. गावाला एकत्र गुंफून ठेवणारा गावाला सुखी, समृद्ध ठेवणारे हे ग्रामदैवत म्हणजेच गावचे भक्ती-शक्ति स्थळ. येथील जुन्या काळातील ग्रामस्थ सांगतात की, मोशी मार्गे नाशिकला कुंभमेळ्यासाठी विविध संप्रदायांतील साधू जातात. त्यापैकीच, एका आखाड्यातील काही साधू कुंभमेळ्याहून परतत असताना त्यामधील एक साधू महाराज आजारी पडले. ते बरे झाल्यानंतरही येथेच थांबले. हेच ते श्री नागेश्वर महाराज.

गावकरी मंडळींनी गावाजवळच त्यांच्यासाठी गवत, बांबूच्या साहाय्याने एक मठ तयार केला. ते नित्य पाच घरी माधुकरी मागत. पीठ, तांदूळ आदी न शिजविलेले पदार्थ घेऊन गावाजवळीलच दक्षिणेकडील आमराईत स्वहस्ते शिजवून ते अन्न खात असत. तिथेच ध्यान-जप-तप करीत असत. गावकरी मठामध्ये



त्यांच्या दर्शनाला जात असत. एका महिलेने जाणीवपूर्वक किंवा नकळत शिजविलेले अन्न वाढून त्यांचा अवमान केला. महाराजांना ते सहन झाले नाही. त्यांनी त्याचक्षणी गावातून जाण्याचा निर्णय घेतला. गावकऱ्यांनी खूप विनवणी केली, माफी मागितली. त्यांनी सर्वांना क्षमा केली, 'सर्वकल्याणभवतुः' आशीर्वाद दिला; पण आपला कार्यकाळ संपुष्टात आल्याने निघायला हवे,' असे सांगून पूर्व दिशेने ते चालू लागले. 'सूर्य अस्ताला जाईपर्यंतच आपला प्रवास असेल,' असे त्यांनी सांगितले. मोशीपासून पूर्व दिशेला सुमारे दहा-बारा किलोमीटर अंतरावर इंद्रायणीच्या तीरावर वसलेल्या काकडे वडगावमध्ये हे योगीमहाराज पोहचले आणि सूर्य अस्ताला गेला. त्याच ठिकाणी महाराजांनी संजीवन समाधी घेतली.

मोशीकरांनी श्री नागेश्वर महाराजांचे एक मंदिर उभारले. आमराईत कायमस्वरूपी नंदादीप प्रज्वलित केला. त्याला आज तपोभूमी म्हणतात. एवढेच नव्हे, महाराजांच्या समाधीचा दिवस माघ अमावस्येला ग्रामस्थ महाप्रसादाचा 'भंडारा' घालतात. आमराईच्या शेतात हजारोंच्या पंगती उठताना, सर्व सोहळा गावकऱ्यांच्या स्वयंशिस्तीत पार पडतो. महाराजांच्या पवित्र अशा मानाची ओटी आणि मानाचे लिंबू तसेच श्रद्धेने महाराजांना अर्पण केलेल्या विविध वस्तूंचा लिलाव केला जातो.

या गावाला ज्ञानोबा-तुकोबांच्या सान्निध्याचा वारसा आहे. हरिनाम सप्ताह, आषाढी, कार्तिकीला ये-जा करणाऱ्या वारकऱ्यांना ग्रामस्थ अन्नदान वाटप करत असतात, म्हणूनच येथे भक्ती आणि शक्तीचा मिलाप झालेला आहे. श्री नागेश्वराचे परमभक्त म्हणून गावातीलच नामदेव काशिबा आल्हाट यांची ख्याती होती. त्यांनी नागेश्वरांची तपोभूमी असलेल्या आमराईत नंदादीप प्रज्वलित केला. श्री नागेश्वरांच्या नंदादीपाची देखभाल, आमराईतील निगा आणि ईश्वराचे नामस्मरण यामध्ये ते अहोरात्र तल्लीन होते. १९९२ मध्ये त्यांनी देह सोडला. त्यांच्यानंतरही नंदादीप सेवा अखंडपणे चालू असून त्यांची ही सेवा त्यांचे कुटुंबीय निष्ठेने पार पाडत आहेत.

### भंडारा उत्सवामधील कार्यक्रमांचे नियोजन

» महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी दरवर्षी श्री नागेश्वर महाराजांचा भंडारा उत्सव सुरु होतो. त्यानुसार गुरुवारी(दि.२७) पासून उत्सवाला सुरुवात होत आहे. गुरुवारी बुंदी अन् शाक भाजीचा महाप्रसाद होणार आहे. शुक्रवारी श्री नागेश्वर महाराज मंदिरात (दि.२८) सकाळी दहा वाजल्यापासून मानाच्या ओटीचा आणि वस्तूंचा लिलाव होईल. शनिवार (दि.२९) कुस्त्यांचा आखाडा दुपारी तीन वाजता सुरु होणार असल्याची माहिती नागेश्वर देवस्थानचे अध्यक्ष नितीन पांडुरंग सस्ते यांनी दिली. देवस्थान ट्रस्टमार्फत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी गुणवत्तेसाठी पुढाकार नागेश्वर देवस्थान ट्रस्टमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांकडून देणगी जमा होते. त्यामधून गोरगरीबांच्या मुलांचे विवाह, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, गोरगरीब विद्यार्थ्यांचा शिक्षणखर्च केला जातो. ट्रस्टमार्फत वीस लाख रूपयापर्यंत शिक्षणक्षेत्रासाठी खर्च केला जात असल्याची माहिती ट्रस्टीमार्फत देण्यात आली.

# हिंजवडी परिसरात परदेशी महिलांकडून वेश्या व्यवसाय

## पिंपरी-चिंचवड क्राईम ब्रांचकडून कारवाई : चार परदेशी महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड क्राईम ब्रांचच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने हिंजवडी परिसरातील कासारसाई येथे एका व्हिला मध्ये कारवाई करत चार परदेशी महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका केली. एजंट ग्राहकांना कासारसाई, लोणावळा परिसरात व्हिला बुक करण्यास सांगत त्यानंतर परदेशी महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत होती.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला माहिती मिळाली कि, एक परदेशी महिला एजंट ग्राहकांना व्हाट्स अप कॉल करून लोणावळा परिसरात व्हिला बुक करण्यास सांगते. त्यानंतर परदेशी महिलांना तिथे घेऊन जात त्यांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेते.

त्यानुसार पोलिसांनी सापळा




लावला असता, संबंधित परदेशी महिलेने एका ग्राहकाला हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कासारसाई येथे एक व्हिला बुक करण्यास सांगितले. व्हिला बुक केल्याचे एजंट महिलेला सांगितले असता ती चार परदेशी महिलांना घेऊन आली. त्यानंतर पोलिसांनी एजंट महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकूण २० हजार २० रुपये किमतीचा ऐवज जप्त केला. तसेच चार परदेशी महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका केली.

ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, सहायक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक संभाजी जाधव, पोलीस अंमलदार सुनील शिरसाट, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, मुकुंद वारे, श्रद्धा भरगुडे, नीलम बुचडे, संगीता जाधव यांनी केली.

# 28 वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न मिटला!

## 40 गुंठे जागेचे भूसंपादन करण्यास महापालिकेला यश : कात्रज चौकातील वाहतूक कोंडी सुटणार

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज चौकातील गेल्या २८ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ४० गुंठे जागेचे भूसंपादन करण्यास महापालिकेला यश आले आहे. त्यामुळे या चौकातील वाहतूक कोंडी आता सुटणार आहे. या जागेसाठी महापालिकेला २१ कोटी ५७ लाख ६० हजार रुपये द्यावे लागले आहेत.

कात्रजकडून कोंढवा रस्त्याकडे जाणाऱ्या मुख्य चौकात ही जागा आहे. संजय गुगळे यांच्या मालकीची ही जागा आहे. शहराच्या १९८७ च्या विकास आराखड्यानुसार (डीपी) ३० मीटर डीपी रस्ता, आणि उद्यानासाठी ६ हजार २०० चौरस मीटर जागा बाधित होती. त्यानंतर २०१७ च्या विकास आराखडयात (डीपी) हा रस्ता ३० मीटर ऐवजी ६० मीटरचा करण्यात आला. कात्रज-कोंढवा रस्ता आणि पुणे-सातारा रस्ता या दोन्हीमध्ये ही जागा बाधित होत आहे. या जागेसाठी रोख मोबदला देण्यात यावा, यासाठी जागा मालक संजय गुगळे हे उच्च न्यायालयात गेले होते. न्यायालयाने त्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले होते.




या जागेचे भूसंपादन २०१३ च्या नवीन कायद्यानुसार करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून या जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरूच होती. विशेष भूमी संपादन अधिकारी हर्षद घुले आणि अजिक्य पाटील यांनी महापालिकेच्या भूसंपादन व व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांच्याकडे जागेच्या ताब्याची कागदपत्रे दिली. या वेळी पालिकेचे उपअभियंता दिगंबर बिगर, शाखा अभियंता रुपाली ढगे, आरेखक संतोष शिंदे उपस्थित होते.

कात्रज चौकात दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. कात्रज चौकातून कोंढव्याकडे जाणारा रस्ता अत्यंत अरुंद आहे. त्यामुळे ही जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले जात होते. यापूर्वी महापालिके आयुक्त म्हणून जबाबदारी सांभाळणारे माजी आयुक्त विक्रम कुमार, माजी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही जागा ताब्यात मिळावी, यासाठी प्रयत्न केले. ही जागा ताब्यात आल्याने रस्ता रुंदीकरण होऊन नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळणार आहे.

### रोख मोबदला देऊन जागा ताब्यात

» कात्रज चौकातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी गुगळे यांच्या मालकीची ४० गुंठे जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिका गेले अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होती. ही जागा ताब्यात द्यावी, त्याच्या बदल्यात 'हस्तांतरणीय विकास हक्क' (टीडीआर) किंवा 'चटई क्षेत्र निर्देशांक' (एफएसआय) देण्याची तयारी महापालिकेने सुरुवातीपासून केली होती. यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर जागामालकाबरोबर बैठकादेखील घेतल्या जात होत्या. जागामालक गुगळे जागा देण्याची तयारी दाखवायचे; मात्र नुकसानभरपाई म्हणून रोख मोबदला द्यावा, अशी मागणी करत होते. त्यामुळे यावर निर्णय होत नव्हता. महापालिकेने सर्वांत पहिल्यांदा ही जागा ताब्यात घेण्याचा प्रस्ताव तयार केला, त्या वेळी त्याची किंमत तीन ते चार कोटी होती. मात्र, आता या जागेसाठी भूसंपादन कायद्यानुसार महापालिकेला २१ कोटी ५७ लाख रुपये द्यावे लागणार आहे. पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, कात्रज चौकातील जागा संबंधित जागामालकाने महापालिकेच्या ताब्यात दिली आहे. ही जागा मिळावी, यासाठी गेले अनेक वर्षे पाठपुरावा केला जात होता. त्याला यश आले आहे. या जागेमुळे येथे रस्तारुंदीचे काम होऊन हा चौक मोठा होणार आहे. त्यामुळे वाहतूककोंडी सुटणार आहे.

# रस्त्याच्या बाजूची जागा कचरामुक्त करून बनवला 'सेल्फी पॉईंट'!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाचे अनोख्या उपक्रमाचे कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने विविध उपक्रम सुरू केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी असा परिसर स्वच्छ करून तेथे 'सेल्फी पॉईंट' केले जात आहेत. अशा जागांवर सेल्फी काढण्यासाठी नागरिकांचीही लगबग वाढू लागली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक जागा कचरामुक्त करीत तो परिसर सुंदर करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक २३ येथील संजीवनी बिल्डींग कॉर्नर येथील परिसर कचरामुक्त करत तो परिसर सुशोभित केला आहे.



कचऱ्यातील टाकाऊ टायरचा तसेच झाकणाचा वापर करत आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी परिसर कचरामुक्त करत सुंदर 'सेल्फी पाईंट' तयार केलाय. तसेच आजबाजूच्या परिसराची स्वच्छता करून त्या जागेला आकर्षक बनवण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी देखील आरोग्य विभागाच्या या कामाचे कौतुक केले असून सगळ्यांसाठी हा सेल्फी पाईंट आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतोय. उप आयुक्त सचिन पवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महापलिका क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी कुंडलिक दरवडे, मुख्य आरोग्य निरीक्षक शशिकांत मोरे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे, आरोग्य सहाय्यक सचिन उघडे यांच्यासह आरोग्य विभागातील इतर कर्मचाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

### पिंपळे गुरव येथे ''वेस्ट टू आर्ट'

» पिंपळे गुरव येथील महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग 'ड' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मधील विजयनगर बस स्टॉप येथील ठिकाण संपूर्ण कचरामुक्त करून त्या परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. टाकाऊ वस्तूंचा वापर करून 'वेस्ट टू आर्ट' संकल्पनेंतर्गत खराब झालेले टायर, पुठ्ठा, मातीचा माठ, टाकाऊ सिमेंटचे पाईप यांचा उपयोग करून आकर्षक सेल्फी पॉईट तयार करण्यात आला आहे. तसेच येथे आरोग्य व पर्यावरण विषयक जनजागृती करणारे सामाजिक संदेश लिहिण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे गेल्या काही दिवसापासून येथे कचरा टाकणे बंद झाले असून स्थानिक नागरिकांकडून आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे. हा परिसर कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक शंकर घाटे, योगेश फल्ले, आरोग्य निरीक्षक प्रणय चव्हाण यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिंपरी-चिंचवड शहरात वाहतूक कोंडीचे 25 स्पॉट

## वर्षभरात वाहतूक कोंडीवर होणार उपाययोजना; अर्थसंकल्पात महापालिकेने केली स्वतंत्र तरतूद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी - चिंचवड शहरातील प्रशस्त रस्ते, ग्रेडसेपरेटर, उड्डाणपूल असूनही शहरातील २५ चौकांत दररोज वाहतूक कोंडीने रस्ते जाम होत आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिकेने अर्थसंकल्पात एक कोटीची तरतूद केली आहे. येत्या वर्षभरात वाहतूक कोंडी काढण्यासाठी महापालिकेकडून २५ चौकांची बांधकामे सुरू केली जाणार आहेत.

महापालिकेचे शहरी दळण-वळण विभाग आणि वाहतूक पोलिसांकडून पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल ८० चौकांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात आली. यामध्ये वाढत्या वाहनांची संख्या, वाहतूक नियमांचे पालनाचे दुर्लक्ष आणि अपुऱ्या पडणाऱ्या रस्त्यांमुळे २५ चौकांत वाहतूक कोंडी होत आहे. येत्या वर्षाअखेर महापालिकेच्या शहरी दळण-वळण विभागाकडून वाहतूक कोंडी होणाऱ्या २५ चौकांतील वाहतुकीत बदल करत विविध उपाययोजना राबवल्या जाणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहर उद्योगनगरी असल्याने शहरातील अनेक औद्योगिक कंपन्या, अनेक कारखाने, हिंजवडी, तळवडे आयटी पार्क, मोरया गोसावी, देहू-आळंदी तीर्थक्षेत्र, शाळा, महाविद्यालये आहेत. राहण्यायोग्य शहर असल्याने पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांचे वास्तव्य वाढत आहे. नागरीकरण वाढल्याने वाहनांची संख्याही दुपटीने वाढली आहे. शहरात वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या बेशिस्त वाहनचालक, सिग्नलला न थांबणारे, फूटपाथ व रस्त्यावर वाहने लावणारे, रस्त्यालगतची अतिक्रमणे अशा वेगवेगळ्या कारणांमुळे सकाळ आणि संध्याकाळ अनेक रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीमुळे शेकडो वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांचा वाहतूक विभाग आणि महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित शहरातील ८० चौकांची पाहणी केली. सतत वाहतूक कोंडी होणारे २५ चौक निश्चित करण्यात आले. आता त्या चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उपाययोजनांची चाचपणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने शंभर दिवसांत विविध कार्यक्रम ठरवून दिले आहेत. या कार्यक्रमानुसार वाहतूक कोंडीच्या २५ चौकांपैकी पहिल्या टप्प्यात दहा चौकांतील कोंडी सोडवण्यात येईल. संबंधित चौकांत वाहतूक पोलिसांकडून मदतनीस, वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल) बदल करणे, एकेरी वाहतूक करणे, चौकात वाहतुकीच्या दृष्टीने बोलार्ड बसवणे, मार्गात बदल असे उपाय करण्यात येणार आहेत. त्यानंतर उर्वरित पंधरा चौकातदेखील वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.



### रस्ता ओलांडण्यास स्पीड टेबल

» शहरातील विविध चौक मोठ्या आकाराचे आहेत. त्यामुळे अशा अनेकदा चौकात वाहतूक कोंडीही अधिक प्रमाणात होत असते. ज्या मोठ्या चौकांमध्ये वाहनांची वर्दळ अधिक असेल. तिथे झेब्रा क्रॉसिंग असून नागरिकांना रस्ता ओलांडता येत नाही. त्या ठिकाणी बदल करून विविध उपाययोजना राबवण्यात येतील. चौका-चौकात पादचारी नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडता यावा, याकरिता 'स्पीड टेबल' तयार करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

### वाहतूक कोंडी होणारे चौक

» मोशीतील भारतमाता चौक, भोसरीतील गोडाऊन चौक, देहू फाटा, बोऱ्हाडेवस्ती चौक, चिखली चौक, त्रिवेणीनगर चौक, चिंचवडचा डांगे चौक, वाकड चौक, काळा खडक रोड, भूमकर चौक, फिनिक्स मॉल परिसर, भुजबळ चौक, ताथवडे भुयारी मार्ग, पुनावळे भुयारी मार्ग, लक्ष्मी चौक, आकुर्डी थरमॅक्स चौक, टिळक चौक, खंडोबा माळ चौक, पिंपरीतील फिनोलेक्स चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नाशिक फाटा, दापोडी चौक, भोसरी बसस्थानक, तळवडे चौक, गणेशनगर चौक या चौकात सर्वाधिक वाहतूक कोंडी होत आहे.

> पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागात, चौकात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वर्षभरात उपाययोजना केल्या जातील. त्यानुसार महापालिकेने २५ चौकांसाठी तब्बल १ कोटीची तरतूद ठेवली आहे. त्या चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रस्तावित आराखडा तयार आहे. हे काम लवकरच सुरू करून वर्षभरात सर्व चौक वाहतूक कोंडी मुक्त करण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन केले आहे.
>
> -शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# 'नर्सिंग होम ॲक्ट'च्या अंमलबजावणीकडे रुग्णालयांचे दुर्लक्ष

## महापालिका अग्निशामक दलाने शहरातील 570 नोंदणीकृत रुग्णालयांपैकी आत्तापर्यंत 403 रुग्णालयांना व्यवसाय अग्नीसुरक्षा प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी नोटिसा बजावल्या आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील काही खासगी रुग्णालये नर्सिंग होम ॲक्टच्या तरतुदींचे पालन करत नसल्याचे समोर येत आहे. रुग्णालयांमध्ये दर्शनी बाजूला उपचार शुल्काचा तक्ता प्रदर्शित न करणे, वैध अग्नीसुरक्षा प्रमाणपत्र न घेणे किंवा त्याचे नूतनीकरण करून न घेणे, उघड्यावरच जैववैद्यकीय कचरा टाकणे असे प्रकार घडत आहेत.

महापालिका अग्निशामक दलाने शहरातील 570 नोंदणीकृत रुग्णालयांपैकी आत्तापर्यंत 403 रुग्णालयांना व्यवसाय अग्नीसुरक्षा प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी नोटिसा बजावल्या आहेत. नोटिसा बजावल्यानंतर 197 रुग्णालयांनी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत. तर, 94 रुग्णालयांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी कायदा, 1949 आणि महाराष्ट्र नर्सिंग होम (सुधारणा) नियम, 2021 अंतर्गत नोंदणीकृत सर्व रुग्णालयांची तपासणी करण्याचे निर्देश जारी केलेले आहेत. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबई आणि पुणे येथे बैठका घेऊन जानेवारी महिन्यात हे आदेश दिलेले आहेत. महापालिकांचे सर्व आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्ह्यांचे सिव्हील सर्जन यांना हे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी आदेश जारी केले आहेत की, जिल्हास्तरीय पथकांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी तत्काळ सुरू करावी. कायद्यामध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे रुग्णालयांकडून पालन होते आहे की नाही, याची तपासणी करायला हवी, असे त्यांनी स्पष्ट केलेले आहे.




### ..तर होणार रुग्णालयांवर कारवाई

» नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांना आवश्यक सुधारणा करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाणार आहे. वाढीव कालावधीनंतर सुधारात्मक कृती पडताळण्यासाठी पुन्हा तपासणी केली जाईल. दुसऱ्या तपासणीनंतरही निर्धारित मानकांची पूर्तता न करणाऱ्या रुग्णालयांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

### रोज गोळा होतो 4 टन कचरा

» शहरातून दररोज साडेतीन ते चार टन इतका जैववैद्यकीय कचरा गोळा केला जातो. शहरातील सुमारे 700 रुग्णालये आणि 2 हजार 500 दवाखान्यांतील बायोमेडिकल वेस्ट गोळा केले जाते. पास्को इन्व्हर्नमेंट सोल्युशन या संस्थेला हा कचरा गोळा करणे आणि त्यावर प्रक्रिया करण्याचे काम सोपविलेले आहे. या संस्थेकडून शहरात 550 कचरा संकलन केंद्राच्या माध्यमातून हा कचरा गोळा केला जातो.

# बारामती, परळी पशुवैद्यकीय महाविद्यालयांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता

**उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. मागील जानेवारी महिन्यात बारामती येथे आयोजित ‘कृषिक-२०२५’ प्रदर्शनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती आणि बीड जिल्ह्यात परळी येथे नवीन कृषी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महिन्याभरातच सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या प्रस्तावांना आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रशासकीय कौशल्य आणि कामाचा झपाटा पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीनं पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. आज मंजूरी मिळालेल्या बारामती आणि परळी येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी ही पशुवैद्यकीय महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.



### बारामती ‘कृषिक 2025’ प्रदर्शनातील घोषणा महिनाभरात पूर्ण

» बारामती येथे जानेवारी २०२५ महिन्यात आयोजित ‘कृषिक-२०२५’ कृषी प्रदर्शनात, शेतकरी आणि पशुपालकांनी बारामतीमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील, अशी घोषणा अजित पवार यांनी सभेत केली होती. त्यानंतर महिन्यातच अजितदादांनी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली. बारामतीतील कऱ्हावागज येथे ८२ एकर आणि परळीच्या लोणी येथे ७५ एकर जागेवर ही शासकीय महाविद्यालये उभारली जाणार आहेत.

**महाविद्यालयांसाठी ११२९ कोटींची आर्थिक तरतूद**

बारामती आणि परळी येथील महाविद्यालयांसाठी एकूण ११२९.१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी ५६४.५८ कोटी रुपये खर्च होणार असून, या निधीतून प्रगत संशोधन केंद्रे, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि आधुनिक सुविधा उभारल्या जातील.

**पशुपालकांचा आनंद, राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत**

या निर्णयामुळे राज्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, अत्याधुनिक पशुवैद्यकीय सुविधा अधिक सुलभ होतील. विशेषतः, बारामती आणि परळी परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय कृषिपूरक व्यवसायांना चालना देईल आणि राज्यातील पशुधन संगोपनासाठी नव्या संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मार्ग मोकळा करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी शेती आणि शेतीपुरक व्यवसायांना चालना देण्याची गरज ओळखून, पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सध्या राज्यात पशुवैद्यकीय सेवा आणि पशुवैद्यकांची मोठ्या प्रमाणावर गरज असून, नवीन महाविद्यालयांमुळे प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढेल आणि राज्यभर पशुसंवर्धन सेवा अधिक भक्कम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रत्येकी 234 नियमित, 42 मानधनावरील पदांना मान्यता

» या शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी मोठ्या प्रमाणात पदनिर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी शिक्षक संवर्गात 96, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी १३८ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याशिवाय, बाह्यस्त्रोतांद्वारे प्रत्येकी ४२ पदे मानधन तत्वावर भरण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**अजितदादांची आणखी एक महत्वपूर्ण कामगिरी!**

राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिन्याभराच्या अतिशय कमी वेळात हा लोकोपयोगी निर्णय मंजूर करून घेतला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील पुणे व बीड जिल्ह्यासह राज्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

# कडधेत आरओ प्लांटच गिळला, ठेकेदाराला पैसेही अदा; मात्र प्लांट बसवलाच नाही

**शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत रिव्हर्स ऑस्मोसिस प्लांट मध्ये 2 लाख 69 हजार 381 रुपयांचा अपहार झाला, गावात आरओ प्लांट न करता परस्पर पैसे काढून घेतले.**

**पुणे | प्रतिनिधी**

कडधे (ता. खेड) गावात शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत रिव्हर्स ऑस्मोसिस प्लांट (आरओ) मध्ये 2 लाख 69 हजार 381 रुपयांचा अपहार झाला आहे. गावात आरओ प्लांट न करता परस्पर पैसे काढून घेतले. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

सबंधित ठेकदाराला तत्कालीन ग्रामसेवक आणि सरपंच यांनी आलेल्या निधीचे सर्व पैसे 7 एप्रिल 2022 रोजी अदा केले. तथापि प्रत्यक्षात प्लांट बसलाच नाही. या प्लांटचे काम गावातील एका सदस्याने एका ठेकेदाराच्या नावावर घेतले मात्र ते पूर्ण न करता संपूर्ण निधी रक्कम काढून घेतली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.



या आरओ प्लांटचे काम न करता धनादेशाद्वारे सरपंच ग्रामसेवक यांनी पैसे दिले कसे? मूल्यांकन दाखला देणारे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे शाखा अभियंता यांनी मूल्यांकन दाखला दिला कसा? ग्रामपंचायतीच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांनी ही रक्कम परस्पर लाटल्याचा आरोप विकास सोसायटीचे संचालक रामदास नाईकडे, ग्रामपंचायत सदस्य रोहिणी मिरजे यांसह ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, सरपंच प्रियांका देवदरे यांनी याबाबतची माहिती देण्याचे टाळले. गावात आरओ प्लांट न करता परस्पर पैसे काढून घेतले. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### ग्रामस्थांनी उपस्थितीत केलेले प्रश्न

» कडधे येथील कुलदैवत खंडोबा मंदिर आवारातील आर.ओ. आहे असे दाखवले. मात्र तेथे वीजजोड नाही, पाण्याचे एटीएम नाही, पाण्याच्या टाक्या नाहीत, फिल्टर यंत्रही नाही. याशिवाय फाऊंडेशन, प्लबिंग असे काहीच नाही. अधिकाऱ्यांनी मूल्यांकन केले तरी कसे, आदी सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केले आहेत..

> “ आपण घरगुती फ्रीज घेतला तरी त्यासाठी स्टँड घेतो. येथे ग्रामपंचायतीने जवळपास पावणे तीन लाख रुपये खर्च करून कोणतीही तरतूद केलेली दिसुन येत नाही.या संपूर्ण बाबीची सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी अशी ग्रामस्थांची भूमिका आहे.
>
> -रामदास नाईकडे, संचालक, कडधे सोसायटी